ePaper

| वर्ष - 6 । अंक - 188 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार । दिनांक 20 ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मध्य प्रदेशचा महाराष्ट्रातील उद्योगांवर डोळा, मुख्यमंत्री चौहान पुण्यात येणार




**आतील पानांत**

- भाजप नव्या पिढीला संधी देणारा पक्ष - चंद्रकांत पाटील
- ध्येय निश्चित केल्यास यश नक्कीच!
- दुष्टचक्र थांबेना! पावसामुळे पीक गेलं


# लांडगे, जगताप अन् बारणेंची ‘महायुती’!

## महापालिकेत मिळवणार का सत्ता एकहाती?

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरातील राजकीय ‘शक्तीस्थळे’ असलेले भाजपा शहराध्यक्ष महेश लांडगे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप आणि मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे एकत्र आल्यामुळे भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना ‘महायुती’ची ताकद मोठ्याप्रमाणात वाढली आहे. त्यामुळे महापालिका आगामी निवडणुकीत ‘महायुती’च्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून सत्तास्थापनेचा दावा केला जात आहे.**



२०१७ च्या निवडणुकीत तत्कालीन शहराध्यक्ष व आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने पिंपरी-चिंचवड महापलिकेत बहुमताने सत्ता मिळवली. त्यावेळी भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनी भाजपाच्या विजयात जगताप यांना मोलाची साथ दिली.

२०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या आमदार लक्ष्मण जगताप आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्यात दिलजमाई झाली.

‘महायुती’चे उमेदवार म्हणून बारणे यांनी राष्ट्रवादीचे तगडे

### राष्ट्रवादी काँग्रेसची डोकेदुखी वाढली
### महायुतीची ताकद तुलनात्मकदृष्या सर्वाधिक

उमेदवार पार्थ पवार यांचा पराभव केला. मावळ मतदार संघातील चिंचवड आणि पिंपरी मतदार संघात लक्ष्मण जगताप यांनी युतीधर्माचे पालन करीत बारणेंना साथ दिली. त्यामुळे मोठ्या फरकाने बारणे विजयी झाले. या दोन्ही नेत्यांचा प्रभाव पिंपरी आणि चिंचवडमध्ये तुल्यबळ आहे. त्याचा फायदा महायुतीला होणार आहे.

दरम्यान, प्रकृतीच्या कारणास्तव आमदार जगताप सक्रीय राजकारणापासून काहीकाळ अलिप् राहीले. मात्र, “प्रथम राष्ट्र...नंतर पक्ष आणि शेवटी मी..” या विचारांचे तंतोतंत पालन करीत जगतापांनी सर्व महत्त्वाच्या निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क बजावला. भाजपाचे उमेदवार विजयीही झाले.

वास्तविक, पूर्वाश्रमीचे राजकीय प्रतिस्पर्धी असलेले आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू शंकर जगताप, खासदार श्रीरंग बारणे आणि आमदार महेश लांडगे यांनी एकत्रितपणे चिखली येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी केली. शहरातील स्थानिक मुद्यांवर सामोपचाराने आणि समन्वयाने निर्णय घेण्याचा पायंडा घातला. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील निर्णय प्रक्रियेत भूमिपुत्र स्थानिकांना समाविष्ट करुन घेण्याचा केलेला निर्धार भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेनेच्या नेत्यांनी खरा करुन दाखवला. परिणामी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या ‘बॅकफूट’ वर दिसत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

### आमदार लांडगे यांनी संभाव्य फूट रोखली...

आमदार जगताप यांचा शहराध्यक्षपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर भाजपाने आमदार लांडगे यांच्यावर शहराध्यक्षपदाची धुरा सोपवली. राज्यात महाविकास आघाडीची सत्ता असताना भाजपामध्ये मोठी फूट पडणार आणि २५ ते ३० नगरसेवक राष्ट्रवादीत सहभागी होणार, अशी स्थिती होती. या प्रतिकूल परिस्थितीत आमदार लांडगे यांनी पक्षश्रेष्ठींच्या मदतीने शहरातील भाजपा एकसंघ ठेवली. माया बारणे आणि वसंत बोराटे असे दोन अपवाद वगळता राष्ट्रवादीच्या गळाला भाजपातील नगरसेवक लागले नाही.

### शंकर जगताप यांची मजबूत बांधणी...

आमदार जगताप यांना प्रकृतीच्या कारणास्तव बाहेर मुक्तपणे संचार करता येत नाही. त्यामुळे त्यांचे बंधू माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी भाजपा निर्णय प्रक्रियेत सक्रिय होण्याचा निर्णय घेतला. त्याला जगताप समर्थक माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी साथ दिली. शंकर जगताप कमालीचे सक्रिय झाले असून, चिंचवडचा बालेकिल्ला मजबूत करण्यासाठी पायाला अक्षरश: भिंगरी बांधली आहे. व्यावसायिक क्षेत्रात ‘मिस्टर परफेक्टनिस्ट’ अशी ओळख असलेले शंकर जगताप आमदार जगताप आणि भाजपाचा ‘चिंचवड गड’ सक्षमपणे सांभाळत आहेत. त्यामुळे भाजपाची ताकद वाढण्यास मदत झाली आहे.

### श्रीरंग बारणेंची सक्रियता भाजपाच्या पत्त्यावर...

खासदार श्रीरंग बारणे आणि राष्ट्रवादीचे नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या राजकीय चुरस आहे. अजित पवार यांचे पिंपरी-चिंचवडमध्ये विशेष लक्ष आहे. बारणे यांचे ‘होम पिच’ असलेल्या थेरगावमध्ये राष्ट्रवादीकडून अजित पवार यांच्या उपस्थितीत दोन कार्यक्रम घेण्यात आले.

त्यामुळे बारणेंनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून स्थानिक मुद्यांवर काम करायला वेग दिला. व्यापारी, पायाभूत सुविधांसाठी बारणेंनी महापालिका आणि पिंपरीसह चिंचवड मतदार संघामध्ये बारीक लक्ष घातले आहे. बारणे थेटपणे अजित पवार यांच्या विरोधात भूमिका घेत आणि जगताप व लांडगे शहरातील कारभार ताकदीने चालवताना दिसत आहेत. त्यामुळे बारणे, जगताप आणि लांडगे ‘महायुती’ भाजपाच्या पत्त्यावर पडली आहे.

# भाजप नव्या पिढीला संधी देणारा पक्ष - चंद्रकांत पाटील

## भाजपच्या प्रदेश सरचिटणीसपदी मुरलीधर मोहोळ

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजप हा मेहनतीने विकसित झालेला, दुसऱ्याला मोठे करण्यात व नव्या पिढीला महत्त्वाची जबाबदारी देणारा हा पक्ष आहे. या पक्षात लोकशाही पद्धतीने काम केले जात असल्याने येथे निवडणूक नाही, खेचाखेची नाही. आपल्यातील एक सहकारी त्याच्या कर्तृत्वावर**



**मोठा झाला याचा आनंद आहे, अशी भावना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त करत माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांचे कौतूक केले.**

भाजपच्या प्रदेश सरचिटणीसपदी मुरलीधर मोहोळ यांची नियुक्ती झाल्याने शहर भाजपतर्फे चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

शहराध्यक्ष जगदीश मुळीक, आमदार भीमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, कार्यक्रमांचे निमंत्रक व माजी सभागृह नेते गणेश बीडकर, पुण्याचे प्रभारी धीरज घाटे, संघटन सरचिटणीस राजेश पांडे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने आदी उपस्थित होते. मुरलीधर मोहोळ म्हणाले, “ गेल्या ३० वर्षांपासून पक्ष हाच परिवार मानून काम करत आहे. वॉर्ड अध्यक्ष पदापासून काम करणाऱ्या एका कार्यकर्त्याला पक्षाने महापौर होण्याची संधी दिली. आता राज्य सरचिटणीसपदी नियुक्ती केली. गोपीनाथ मुंडे यांनी काम करण्याची प्रेरणा व आधार दिला. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील यांच्यासह सर्वच नेत्यांकडून खूप शिकायला मिळाले. माझ्यावर टाकलेला विश्वास मी कधीही ढळू देणार नाही. पुनीत जोशी यांनी सूत्रसंचालन केले तर, बीडकर यांनी प्रास्ताविक केले.

### सत्कार समारंभ की निरोप समारंभ

**मुरलीधर मोहोळ यांच्या सत्काराचा कार्यक्रमात कोपरखळ्यांनी गाजला. शहराध्यक्ष मुळीक यांनी भाषणात मोहोळ यांचे कौतुक करताना राज्याचे सरचिटणीस म्हणून मुरलीधर मोहोळ यांनी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भात काम करावे, आम्ही पुणे सांभाळू असा चिमटा काढला.**

**त्यावर मोहोळ यांनी ‘माझा हा सत्कार समारंभ आहे की निरोप समारंभ आहे ? असा प्रश्न उपस्थित करून मुळीक यांना टोला लगावला. मात्र, यानंतर चंद्रकांत पाटील यांनी मोहोळ यांना उद्देशून “तुमची पुण्यातून सुटका नाही. तुम्हाला पुण्यातही काम करायचे आहे. आपले मुळ जपले पाहिजे” असा वडिलकीचा सल्ला देत या विषयावर पडदा टाकला.**

## पुणे-नगर आणि शिक्रापूर-चाकण रस्त्यांवर अवजड वाहनांना बंदी

।पुणे। महाईन्यूज ।

शिक्रापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पुणे-नगर आणि शिक्रापूर-चाकण या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी अवजड वाहनांना बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मार्गावर जड वाहनांची वाहतूक २१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर बंद राहणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत अवजड वाहनांची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. शिक्रापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पुणे-नगर





महामार्गावर २० किलोमीटर आणि शिक्रापूर-चाकण मार्गावरील ९ किलोमीटर भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यालगत गोडाऊन, शाळा-महाविद्यालय, मंगल कार्यालय, रुग्णालय आणि एमआयडीसी परिसर आहे.

पुणे-नगर रस्ता हा कोरेगाव भीमा, सणसवाडी, शिक्रापूर आणि कोंढापुरी गावाच्या हद्दीतून जातो. त्याठिकाणी चाकण आणि रांजणगाव एमआयडीसी क्षेत्र असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अवजड वाहने मोठ्या प्रमाणावर ये-जा करीत असतात. तसेच, रस्त्यावर स्कूल बसेसमधून विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. तसेच, रांजणगाव आणि चाकण एमआयडीसी येथे मालक, कामगार वर्ग यांच्या बसेस, खासगी वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असते. या भागात अवजड वाहनांमुळे नेहमीच वाहतूक कोंडी आणि अपघात होत आहेत. या वाहतूक कोंडीमुळे बाहेरगावी जाणाऱ्या आणि स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यावर उपाययोजना म्हणून या रस्त्यांवरील वाहतूक काही काळ करण्यात यावी, ही बाब पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक अभिनव देशमुख यांनी निदर्शनास आणून दिली होती. या प्रस्तावास जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी मान्यता दिली आहे.

## पुण्यात वीजांच्या कडकडाटांसह पुन्हा पावसाला सुरूवात

### सुरक्षित राहण्याचे आवाहन





।पुणे। महाईन्यूज ।

दोन दिवसांपूर्वी पुण्यात पावसाने अक्षरक्षः थैमान घातले होते त्यानंतर थोड्याशा विश्रांतीनंतर आज पुन्ही पावसाला सुरूवात झाली आहे. रात्री रात्री साडेनऊच्या सुमारास पुण्यात मेघगर्जनेसह पाऊस सुरू झाला आहे. मध्य पुण्यात गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह सध्या मध्यम ते जोरदार सरी बरसत आहेत.

पुण्यात मेघगर्जनेसह पाऊस सुरू झाला आहे. मध्य पुणे येथे गडगडाट, विजांच्या कडकडाटासह सध्या मध्यम ते जोरदार सरी कोसळत आहेत. पाऊस रविवार इतका नसला गंभीर दिसत नाही, पण काळजी घ्या आणि गडगडाटाच्या वेळी सुरक्षित राहा अशी माहिती ट्विट करत भारतीय हवामानशास्त्र पुणे विभागाचे प्रमुख के एस होसळीकर यांनी दिली आहे. दरम्यान औंधगावात पावसाला सुरुवात झाली आहे. तर पाषाण, सूस, महाळुंगे, सुतारवाडी येथे पावसाची शक्यता असून पावसाचे वातावरण तयार झाले आहे. तर घोरपडीमध्ये पुन्हा जोरदार पाऊस पडला. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून तर रस्त्याला नदीचे स्वरूप आले आहे. राज्यातही गुरुवारी (ता. २०) कोकण, मध्य महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांमध्ये विजांसह पावसाची शक्यता कायम आहे. उर्वरित राज्यात पावसाचा जोर ओसरण्याची चिन्हे असून, तुरळक ठिकाणी हलक्या सरींचा अंदाज आहे. उत्तर अरबी समुद्रापासून तमिळनाडूच्या किनाऱ्यापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. पूर्व-मध्य अरबी समुद्रामध्ये महाराष्ट्राच्या किनाऱ्यालगत समुद्र सपाटीपासून १.५ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती, तसेच त्यापासून केरळ किनाऱ्यापर्यंत हवेचा दक्षिणोत्तर कमी दाबाचा पट्टा कायम आहे.

## एकनाथ शिंदेंकडं पाहिल्यास बाळासाहेबांचा होतो भास - उदय सामंत

। पिंपरी । । महाईन्यूज ।

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी पुण्यात कार्यकर्ता मेळावा घेतला. यामध्ये त्यांनी कार्यकर्त्यांना प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला. तसेच दसरा मेळाव्याचा उल्लेख करत आपल्या दसऱ्या मेळाव्याला सर्वाधिक गर्दी होती, पण आपण मार्केटिंगला कमी पडलो असं त्यांनी सांगितलं. तसेच एकनाथ शिंदेंकडं पाहिल्यास बाळासाहेब ठाकरेंचा भास होतो असंही त्यांनी म्हटलं



सामंत म्हणाले, शिंदे साहेबांनी घेतलेला निर्णय योग्य होता हे आता कळलं आहे. मी लवकरच कात्रजला मेळावा घेणार आहे, कोणीतरी माझ्यावर हल्ला केला म्हणून कात्रजला मेळावा घेणार नाही. 100 दिवसात केलेलं काम मी या मेळाव्यात मांडणार. बाळासाहेबांची शिवसेना पुण्यात वाढवल्याशिवाय राहणार नाही. तरुणांना उद्योगासाठी 10 लाखाचं कर्ज लवकर उपलब्ध करून देणार. पुण्यामध्ये आपल्याला 1,500 उद्योजक निर्माण करायचे आहेत, हे युवा सैनिकांना आता टार्गेट आहे. काही लोक आधी सांगायचे की आम्ही वडापाव खाऊन काम केलं. पण तेव्हा शाखाप्रमुख वडापाव खायचा आणि वरचे लोक बिर्याणी खायचे. आता बिर्याणी वरच्या लोकांनी खाल्ली तर खालचा शाखाप्रमुख देखील बिर्याणीच खाणार. भविष्यत शिंदे साहेब जो उमेदवार देतील त्याला निवडून द्यायचं आहे.

# ध्येय निश्चित केल्यास यश नक्कीच!

## आयुक्त शेखर सिंह यांचे मत : 'लक्षवेध-क्रॅकिंग द कोड' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना स्वतःची क्षमता ओळखून योग्य वेळी निर्णय घेणे गरजेचा आहे. ध्येय नक्की काय आहे आणि ते आपल्याला का साध्य करायचे, हे अगोदर ठरवून त्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक असून खडतर मेहनत करून विश्वासाने ध्येयाचा पाठपुरावा केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड आणि डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने "अर्बन आऊटकम्स फ्रेमवर्क २०२२" अंतर्गत पिंपरी येथील डॉ.डी.वाय.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सभागृहामध्ये विद्यार्थ्यांसाठी 'लक्षवेध-क्रॅकिंग द कोड' हा मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी आयुक्त ते बोलत होते. सहायक पोलिस आयुक्त श्रीकांत डिसले, डॉ.डी.वाय.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पिंपरीचे सचिव डॉ. सोमनाथ पाटील, फॉक्सबेरीचे सीईओ अंकित भार्गव, फार्मदीदी संस्थेचे सहसंस्थापक अनुक्रीत जोहारी या मान्यवरांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

यावेळी, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, प्राचार्य डॉ.एल.के. वाधवा, कार्यकारी संचालक प्रा. अविनाश ठाकूर, डीन प्रा. धीरज अग्रवाल, उपायुक्त रविकिरण घोडके, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह स्मार्ट सिटी व स्मार्ट सारथी टीमचे प्रतिनिधी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आयुक्त शेखर सिंह पुढे म्हणाले, कॉलेज जीवनात अभ्यासाबरोबरच खेळ, कल्चरल इव्हेंटमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे. यामुळे व्यक्तिमत्व विकास सर्वांगाने घडण्यास मदत होते. कोणत्याही स्पर्धा परीक्षा देताना विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी प्रयत्नशील रहायला हवे. स्पर्धा परीक्षा देताना वेळेची मर्यादा बांधून घेणे आवश्यक आहे.

लोकसेवेत कार्यरत असताना अनेक गोष्टींचा त्याग करावा लागत असून त्यासाठी मनाची तयारी असणे आवश्यक आहे. स्पर्धा परिक्षेची तयारी करताना काय वाचू नये हे कळणे महत्त्वाचे आहे. रोजचे वर्तमानपत्र वाचल्याने नकळत आपल्या ज्ञानात भर पडत असते. सोशल मिडीयाचा वापर योग्य पद्धतीने करावा. स्पर्धा परीक्षेत अपयश आले म्हणून खचून न जाता आपल्या आवडत्या क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करायला हवे, मेहनत हा यशाचा खरा मार्ग आहे, असे त्यांनी सांगितले. सहायक पोलिस आयुक्त श्रीकांत दिसले म्हणाले, कॉलेज जिवनात विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळी ऊर्जा असते. एखादे ध्येय मनापासून ठरवून त्यासाठी जिद्दीने प्रयत्न केले तर यशाचे शिखर नक्की गाठता येते. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना प्लान बी देखील तयार असावा. स्पर्धा परीक्षेत अपयश आले तरी स्वतःचा व्यक्तिमत्व विकास उत्तम झालेला असतो जो आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी खूप महत्वपूर्ण ठरतो. फॉक्सबेरी टेक्नोलॉजीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित भार्गव म्हणाले, यशस्वी उद्योजक होण्यासाठी नियोजन, बोलण्याची उत्तम कला, नेतृत्वगुण तसेच समस्या शोधून त्यावर मार्ग काढण्याची वृत्ती गरजेची आहे. प्रत्येक गोष्टीची मुलभूत माहिती असणे आवश्यक आहे. यशस्वी करिअर घडविण्यासाठी योग्य दिशा आणि सुरुवातीपासूनची तयारी महत्वाची ठरत असल्याचे भार्गव यांनी यावेळी स्पष्ट केले.

### देशात स्पर्धा वाढली, विद्यार्थ्यांना करीअरचा प्रश्न

**अनुक्रीत जोहारी म्हणाले, व्यवस्थापन क्षेत्रात करीयर घडविताना वेळेचे नियोजन आवश्यक आहे. देशात स्पर्धा वाढली आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना करीअरचा प्रश्न निर्माण होत असून आपली वाट सक्षम असायला हवी, असे मत इंडियन इंस्ट्रीटयुट ऑफ मॅनेजमेंट, कोलकाता येथून शिक्षण पूर्ण केलेले आणि फार्मदीदी संस्थेचे सहसंस्थापक अनुक्रीत जोहारी यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. सोमनाथ पाटील यांनी तर सूत्रसंचालक पायल भार्गव यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन स्मार्ट सिटी व स्मार्ट सारथी टीमद्वारे करण्यात आले.**

# मृतदेह बदलल्याने चुकीच्या महिलेवर अंत्यसंस्कार

## नातेवाईकांनी केली वायसीएम डीन कार्यालयात तोडफोड

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**दापोडी येथील एका महिलेचा मृतदेह शिवविच्छेदन करताना बदलला. यावरून मयत महिलेच्या नातेवाईकांनी वायसीएम हॉस्पिटलमध्ये गोंधळ घालत डीन कार्यालयात तोडफोड करत गोंधळ घातला. संतप्त नातेवाईकांची गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांनी अधिकची कुमक आल्याने वायसीएम परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे.**



स्नेहलता अशोक गायकवाड (वय ५७, रा. दापोडी) हे महिलेचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी अंगावर भिंत कोसळल्याने ती महिला गंभीर जखमी झाल्या. सुरुवातीला औंध येथील रुग्णालयात नेण्यात आले. तिथून त्यांना एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र तिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर शवविच्छेदन करण्यासाठी गायकवाड यांचा मृतदेह पिंपरी येथील वायसीएम शवविच्छेदनगृहात पाठविण्यात आले होते.

मृतदेहाचे मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास शवविच्छेदन करण्यात आले. बुधवारी मध्यरात्री शवविच्छेदनगृहात तीन महिलांचे मृतदेह होते. पहाटे तीन वाजताच्या सुमारासस्नेहलता यांच्या नातेवाईकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले त्यांचे गुजरात येथून नातेवाईक येण्याचे येत असल्याने त्यांच्यावर बुधवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात येणार होते.

त्यामुळे स्नेहलता यांचे नातेवाईक बुधवारी सकाळी सात वाजता पुन्हा त्यांची पाहणी करून गेले. त्यावेळी देखील स्नेहलता यांचा मृतदेह शवविच्छेदनगृहात होता मात्र अकरा वाजताच्या सुमारास त्यांचे नातेवाईक अंत्यसंस्कार करण्यासाठी मृतदेह ताब्यात घेण्यासाठी आले. मृत्यू गाडीमधून घेऊन जात असताना तो मृतदेह स्नेहलता यांचा नाही हे नातेवाईकांच्या निदर्शनास आले. नातेवाईकांनी शुभविच्छेदनगृहात जाऊन पाहणी केली असता स्नेहलता यांचा मृतदेह तिथं नसल्याचे उघड झाले.

### पोलिसांनी अधिकची कुमक मागविली

**संतप्त नातेवाईकांनी वायसीएम रुग्णालयात गोंधळ घातला नातेवाईकांनी डॉ. वाबळे यांचे कार्यालयाची तोडफोड केली. संतप्त नातेवाईकांची गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांनी अधिकची कुमक मागविली त्यावेळी वायसीएम परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. स्नेहलता यांचे नातेवाईक सकाळी 11 वाजता येण्यापूर्वी दोन मृतदेह देण्यात आले आहेत. त्या दोन्ही मृतदेहांवर अंत्यसंस्कार देखील करण्यात आले आहेत. त्यामुळे स्नेहलता यांचा मृतदेह कुठे गेला याबाबत पोलीस चौकशी करीत आहेत.**

## संपादकीय

# महाजालाचा फास

***अनेकदा सेक्सटॉर्शन किंवा कर्जांच्या ॲपमध्ये फसलेले लोक तक्रार करीत नाहीत. लोकापवाद म्हणजे समाजात होणारी बदनामी हा काल्पनिक राक्षस, हीच या ब्लॅकमेल करणाऱ्या सगळ्या गुन्हेगारांची मोठी ताकद असते. ॲपवरून घेतलेली कर्जे न फेडल्यास मारहाण करणे, दमदाटी करणे हे प्रकार तर होतातच; पण बदनामी केली जाते.***

‘सेक्सटॉर्शन’ हा शब्द अमेरिकेच्या कॅलिफोर्निया राज्यात १९५० मध्ये पहिल्यांदा वापरला गेला; तेव्हा तो पुढील काही दशकांमध्ये विश्वव्यापी होईल, याची कुणाला कल्पना असेल? सेक्स आणि एक्सटॉर्शन म्हणजे खंडणीखोरी यांचे जहरी मिश्रण म्हणजे सेक्सटॉर्शन. समाजमाध्यमांचा, नव्या तंत्रसाधनांचा आणि संवादाच्या नवनव्या फलाटांचा जसजसा विस्तार होतो आहे; तसतसे हे लैंगिक ई-छळाचे प्रमाण वाढत चालले आहे. अशा लैंगिक छळासोबतच आर्थिक एक्सटॉर्शन म्हणजे खंडणीखोरीनेही समाजाला ग्रासले आहे. नव्या आधुनिक युगाचे हे दोन शाप दूर करायचे असतील तर सर्व तपासयंत्रणा, समाजातील तंत्रकुशल तरुण आणि ई-साक्षर समाज या साऱ्यांना एकत्र येऊन लढा द्यावा लागेल. नाहीतर, पुण्यात काही दिवसांच्या फरकाने जसा दोन तरुणांचा प्राण गेला किंवा महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांमध्ये ॲपद्वारे कर्ज घेतल्यानंतर झालेल्या छळामुळे ज्या आत्महत्या झाल्या; त्यांचे प्रमाण वाढत जाईल. आधुनिक साधने किंवा तंत्रज्ञानाचा आधार घेऊन गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना आधी शोधून काढणे, त्यांच्यावर खटले भरणे आणि त्यांना शिक्षा होणे, ही किचकट प्रक्रिया आहे. त्यातच, आपली पोलिस दले अजून पुरेशी तंत्रसक्षम बनलेली नाहीत. तेव्हा अगदी शाळा-कॉलेजपासून सगळ्याच शैक्षणिक संस्था तसेच सामाजिक संघटनांनी तातडीने हाती घ्यावा, असा हा विषय आहे. राजकीय पक्षांकडे मोठ्या संघटना असल्या तरी त्यांना या विषयाचे गांभीर्य कळण्याची शक्यता कमीच आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांचा फॉर्म्युला ठरलेला असतो. आधी संवादात गुंतवायचे, असे ई-संवाद वाढवायचे आणि जाळ्यात फसवून काही ना काही बोलायला, वागायला भाग पाडायचे आणि नंतर त्याचाच बागुलबुवा करून पैसे उकळायचे, अशी ही रीत असते. सध्या कर्जे देणाऱ्या ॲप्समध्येही पैसे उकळायचे, हाच एकमेव हेतू असतो. आपल्याला फार सहज कर्ज मिळते आहे, असा गैरसमज या ॲप्सचा सुळसुळाट झाल्याने झाला आहे. प्रत्यक्षात ती आधुनिक रूप ल्यायलेली पठाणी सावकारीच आहे.

# 5 जी नेटवर्क आणि जनसामान्य जनता



भूमिका

निलेश दूटाळ
+91 87668 40811




मोबाईल नेटवर्क क्षेत्रात भारत हा जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेला देश आहे. भारतातील 100 कोटींहून अधिक लोक मोबाईलचा वापर करत आहेत. जवळपास 1991 पासून 2 झी नेटवर्क सेवा भारतात सुरु झाली. सुरुवातीला मोबाईलच्या किंमती वापराचे बिल अधिक असल्याकारणाने ठराविक लोकांकडेच मोबाईल होता. हळूहळू मोबाईलचा विकास होत गेला आणि त्यानंतर मोबाईलच्या किंमती कमी होत गेल्या. नंतर सर्वसामान्य लोकांच्या हाती मोबाईल आला. सुरुवातीला ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी टेलिकॉम कंपन्यांनी वेगवेगळ्या ऑफर देऊ केल्या. प्रत्येक कंपनीने आपल्या ग्राहकांच्या संख्येत कशी वाढ होईल याच्याकडेच लक्ष दिले. मोबाईल वापरकर्ते ही वाढले. 2झी, 3झी, 4झी नेटवर्क नंतर 1 ऑक्टोबर पासून भारतात 5झी नेटवर्कलाही सुरुवात झाली. देशात 4झी नेटवर्कला 2015 मध्ये सुरुवात जरी झाली असली तरीही आज लाखोंच्या संख्येमध्ये 2झी मोबाईलचा वापर करणारे ग्राहक आहेत. हे विसरता कामा नये. ग्राहक आहेत तर काही रोजंदारीवर मजुरी करणारे मजुर आहेत असे ग्राहक आपल्या उत्पन्नातील काही पैश्यांची बचत करुन मोबाईलचा रिचार्ज करतात. 2015 मध्ये 4झी नेटवर्कला सुरुवात झाली. यामध्ये जीओ मोबाईल ही कंपनी नव्याने स्थापन झाली. सुरुवातीला जिओ मोबाईलने ग्राहकांना मोफत ऑफर देवून आपल्याकडे वळवले. स्पर्धा निर्माण झाली. स्पर्धेमध्ये इतर कंपन्या तोट्यात जावू लागल्या. त्यानंतर बहुतांशी टेलिकॉम कंपन्यांनी रिचार्जच्या रक्कमेमध्ये वाढ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर मोफत असणारी इनकमिंग सेवा बंद करण्यात आली. तसेच टॉकटाईम साठीचे असणारे छोटे रिचार्ज हटवण्यात आले. अल्प उत्पन्न असणाऱ्या ग्राहकांना छोटी रिचार्जच सोईस्कर असतो. छोटे रिचार्ज बंद करण्यात आले. मोबाईल चालू ठेवण्याकरिता कमीत कामे 100 5 चा रिचार्ज अधिक महागाईने जनतेचे कंबरडे मोडले आहे आणि त्यात भर म्हणून मोबाईलचा रिचार्जही महागला आहे. स्मार्ट फोन बरोबर स्मार्ट रिचार्जही (टॉकटाईम+डाटा) बाजारात आला. 2 झी मोबाईल वापरण्याच्या ग्राहकासाठी स्मार्ट रिचार्ज काय कामाचा ज्याच्यामध्ये डाटा दिलेला असतो ज्या ग्राहकाला मोबाईलचे आकडे समजत नाहीत, कॉल करण्यासाठी दुसऱ्याचा आधार घ्यावा लागतो. त्याला 4 झी आणि 5झी काय समजणार? त्यामुळे सामान्य ग्राहकासाठी छोटा रिचार्ज असायला हवा होता. साधारणत: जुलैच्या शेवटी 5 झी स्पेक्ट्रमची बोली लावली गेली. त्याच्यामधून केंद्र सरकारला 1.5 लाख कोटींचा महसुल मिळाला. 1 ऑक्टोबर 2022 पासून 5 झी सेवेला सुरुवात जरी झाली असली तरी आज 4 झी नेटवर्क संदर्भातील अनेक पोहोचलेले नाही आणि जिथे पोहचले आहे तिथेही नेटवर्क संबंधी अनेक तक्रारी आहेत. तसेच टेलिकॉम कंपन्यांनी एक महिन्याच्या रिचार्जची मुदत 28 दिवसांची केली. म्हणजे प्राधिकरणचे नियंत्रण नसल्याचे लक्षात येते 5झी च्या निमित्ताने मोबाईलचा रिचार्ज दरात वाढ होण्याची शक्यता आहे.

असो, टेलिकॉम कंपन्या आपल्या 4 झी नेटवर्क संदर्भातील त्रुटीमध्ये सुधारणाकरुन, 5 झी नेटवर्क सेवा जनतेला सुरळीत पुरवतील तसेच 5 झी सेवा ग्रामीण भागात पोहचवतील. सरकारी नियंत्रण संस्था टेलिकॉम कंपन्यावर नियंत्रण ठेवतील. तसेच 4 झी नेटवर्कच्या स्पीड पेक्षा 5 झी चे स्पीड हे 10 पट अधिक असेल. 5 झी च्या सेवेवर ग्राहक समाधानी असेल. अशी आशा करण्यास कोणतीही हरकत नाही.

# वातावरण बदलांचा सांगावा

**तापमानवाढीमुळे सध्या अतिवृष्टी, ढगफुटीसारख्या घटना घडत आहेत. पुणे, नाशिक, औरंगाबाद आदी ठिकाणी त्याचा वारंवार प्रत्यय येतो आहे. वातावरणातील बदलांमुळे येत्या काळात आणखी भीषण परिस्थिती निर्माण होणार असून, त्यासाठी आजच उपाययोजना सुरू केली पाहिजे...**

महिनाभरापासून पाकिस्तानात धो धो पाऊस कोसळतो आहे. एक तृतीयांश पाकिस्तान महापुराने व्यापला गेला. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांनी पुराबरोबर प्रचंड गाळ संपूर्ण प्रवाहात व आजूबाजूच्या परिसरात पसरवला आहे. यामुळे शेती, पर्यावरण आणि जनजीवन विस्कळीत झाले. भारतीय महाद्वीपात सन २००० पासून मागच्या दीडशे वर्षांत ०.६८ डिग्री सेल्सियसने तापमानात वाढ झाली, तर २०२१ ते २०३० च्या दरम्यान तापमानवाढ ०.५ डिग्री सेल्सिअसने वाढेल, असे अनुमान आहे. या शतकाच्या अखेरपर्यंत तापमानवाढ दोन ते चार डिग्री सेल्सियस असेल, असा अंदाज आहे. तापमानवाढीचे भीषण परिणाम आपण याच वर्षात अनुभवले. देशभरात तापमान वाढीमुळे यंदा गव्हाच्या उत्पादनात मोठी घट झाली. हिमालयात बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेला प्रचंड वेग येत आहे. त्यामुळे कमी काळात प्रचंड पाऊस, मोठा पूर तसेच उन्हाळ्यात बाष्पीभवनाच्या प्रक्रियेत वाढ, जंगलांतील वणवे, कार्बन डायऑक्साइडची अधिक निर्मिती यांसारखे



भीषण परिणाम जाणवत आहेत.

यावर्षी भारतात काही भागांत तापमान ४८ डिग्रीपर्यंत पोहोचले. दुष्काळ, पूर, शेतीचे अपरिमित नुकसान, पिकांच्या उत्पादनात घट, शेती व त्यावर अवलंबून रोजगारांत होणारी घट, शेतीतील वाढता तोटा व त्यामुळे मोठे स्थलांतर, शहरात एकदम पडणाऱ्या पावसामुळे होणारी भीषण परिस्थिती महाराष्ट्रात सांगली, कोल्हापूर, सिन्नर व त्यानंतर आता बेंगळुरूत आपण अनुभवली आहे. कमी काळात जास्त पाऊस पडल्याने भीषण परिस्थिती उद्भवते आहे. शहरातील पाणी निचरा होण्याची यंत्रणा या पावसामुळे हतबल होते. मालमत्ता, जनावरांची, शेतीची प्रचंड हानी होते. संपूर्ण मानवताच जणू पुन्हा शून्यापासून सुरुवात करते. भारताला तर पूर, दुष्काळ या परिस्थितीचा सामना अनेक पातळीवर करावा लागेल. पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ आदी सर्व प्रदेशांतून विस्थापितांचे लोंढे या नैसर्गिक आपत्तीमुळे येत्या ५० वर्षांत भारतात येण्याची शक्यता आहे. सर्वाधिक धोका बांगलादेशापासून आहे. हिमालयीन नद्यांचा महासमुद्र बांगलादेशाला अनेकदा विळखा घालतो. भविष्यात तापमानवाढीमुळे प्रचंड पाऊस, बर्फ वितळणे या समस्यांमुळे संपूर्ण बांगला देशात पुराचे संकट वारंवार येणार आहे. गेल्या शंभर वर्षांत समुद्राच्या पातळीत ०.३ सेंटीमीटरने वाढ होणे हेच मुळात चिंताजनक आहे. तापमानवाढीमुळे बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेला अधिक वेग प्राप्त होईल. त्यामुळे समुद्रपातळीत वाढ होऊन अनेक गावे, नगरे, वसाहती पाण्याखाली जाऊ शकतात. सध्या आशिया खंडात अनेक देशांवरील पूरसंकट त्याचे सूतोवाच करीत आहे. दुष्काळ आणि पूर या दोन्ही समस्यांवर आजच उपाय सुरू केले पाहिजेत.

## ।। अभंगवाणी ।।



न ये नेत्रां जळ ।
नाहीं अंतरीं कळवळ ।।१।।
तों हे चावटीचे बोल ।
जन रंजवणें फोल ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दुष्टचक्र थांबेना! पावसामुळे पीक गेलं!

## पाच दिवसात 5 शेतकऱ्यांनी संपवलं जीवन

।बीड। महाईन्यूज।

जिल्ह्यात अतिवृष्टीचा मोठ्या प्रमाणात फटका शेतकऱ्यांना बसला आहे, सततच्या पावसाने शेतीचे मोठे नुकसान झाले असून या आस्मानी संकटामुळे शेतकरी नैराश्यात गेल्याचे दिसून येत आहे. पावसामुळे झालेल्या पीकाच्या नुकसानीला कंटाळून जिल्ह्यातील शेतकरी टोकाचे पाऊल उचलत असून आज एकाच दिवशी जिल्ह्यात दोन शेककऱ्यांनी आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

आज बीडच्या घारूर तालुक्यातील उंबरेवाडी येथील सुर्यकांत लक्ष्मण खोत यांनी पावसामुळे झालेल्या शेतीच्या नुकसान आणि कर्ज फेडायचं या विवंचनेतून गळफास घेत आत्महत्या केली. तर माजलगाव तालुक्यातील राजेगाव येथील रामेश्वर रकटे वय २३ या तरूण शेतकऱ्यांने गळफास लावून आत्महत्या केली. बीड जिल्ह्यात गेल्या पाच दिवसात परतीच्या पावसाने केलेल्या नुकसानीमुळे ५ शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलले आहे. दरम्यान मागच्या वर्षी एकूण २१० शेतकरी आत्महत्या झाल्या होत्या तर यंदा फक्त नऊ महिन्यातच ९६ शेतकऱ्यांनी आपलं जीवन संपवलं आहे.



सततच्या पावसामुळे होणारे नुकसान आणि त्याची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत आणि शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी असे निर्देश प्रशासनाला दिले आहेत, या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल असे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले आहे.

## पोलिसांचा इशारा! ऑनलाइन पैसे गुंतवायला भाग पाडून आमिष देणाऱ्यांवर आता गुन्हा

### पोलिस उपायुक्त बापू बांगर यांचा इशारा

।सोलापूर ।महाईन्यूज।

‘सीसीएच’ या क्लाउड मायनर ॲपमध्ये पैसे गुंतवून ज्यादा पैशांचे आमिष दाखवून शहरातील नागरिकांची ४५ लाख ४५ हजार ६०० रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. शहर पोलिसांनी आता ज्यादा पैशाचे आमिष देऊन लोकांना पैसे गुंतवायला भाग पाडणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी दिला आहे. नागरिकांना परदेशी चलनात दररोज परतावा देण्याचे आमिष दाखवून वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून पैसे गुंतवायला भाग पाडणाऱ्या ‘सीसीएच’च्या तीन एजंटांविरुध्द फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखा तपास करीत आहे. परंतु, अजूनही काही लोक तक्रारीसाठी पुढे आलेले नाहीत. त्यांना पुराव्यानिशी पोलिस आयुक्तालयात येण्याचे आवाहन शहर पोलिसांनी केले आहे. लोकांना ‘सीसीएच’ ॲप डाउनलोड करायला भाग पाडून एजंटांच्या माध्यमातून पैसे गुंतवायला भाग पाडले गेले. एकमेकांच्या ओळखीने अनेक मित्रांनी, नातेवाइकांनी, परिसरातील नागरिकांनी व्याजाने, उसने, बँक लोन करून त्यात पैसे गुंतवले. पण, काही दिवसांतच ॲप बंद पडले आणि आपली फसवणूक झाल्याची खात्री होताच अनेकांनी पोलिसांत धाव घेतली. काही छोटे गुंतवणूकदार लोक आता त्या एजंटांकडे पैसे देण्याचा तगादा लावत आहेत.

### एमएलएम अन् ब्लॉक चेनचे आमिष

**मल्टिलेवल मार्केटिंग स्किम व ब्लॉक चेनच्या आमिषातून कमी दिवसांत ज्यास्त पैसे कमवता येतील, असे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करणारे अनेक ॲप सध्या सायबर गुन्हेगारांनी आणले आहेत. पण, लोकांना त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन शहर पोलिसांनी केले आहे. तसे आमिष कोण दाखवून पैसे गुंतवायला भाग पाडत असल्यास पोलिसांशी संपर्क करावा, असेही पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी म्हटले आहे.**

## मशाल आणि मनातील विस्तवाशी खेळू नका; ठाकरे समर्थकांचा नवी मुंबई पोलिसांना इशारा

नवी मुंबई : राज्यात झालेल्या सत्तांतरा नंतर शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट यांच्या आरोप प्रत्यारोप आणि कुरघोडयांचे सत्र सुरु झाले आहे.ठाणे आणि नवी मुंबईतही ठाकरे समर्थकांना पोलिसांच्या बळाचा वापर करुन खोटे गुन्हे दाखल करुन वेठीस धरण्याचा प्रकार सुरु झाला आहे.



या पोलिसांकडून एक प्रकारे ही दडपशाही सुरु असल्याचा आरोप करीत नवी मुंबईतील ठाकरे समर्थकांनी पोलिस मुख्यालयावर मोर्चा काढला. ईडी सरकारच्या मुख्यमंत्र्यांची सुपारी घेऊन आणि शिंदे गटाचे मंडलिकत्व पत्करून जर पोलीस मातोश्रीच्या निष्ठावंतांना संपवण्याचा प्रयत्न करीत असतील तर खपवून घेतले जाणार नाही. विनाकारण जर पोलिस शिवसैनिकांना त्रास देत असाल तर आमच्या हातात आता मशाल आणि मनात विस्तव आहे.

## ठाकरे कुटुंबाच्या मालमत्तेविरोधात हायकोर्टात याचिका;

### पुढील सुनावणी 16 नोव्हेंबरला

। नाशिक ।महाईन्यूज।

राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या कुटुंबियांविरोधात बेहिशेबा मालमत्ता जमवल्याचा आरोप करण्यात आला आहे. मालमत्तेबाबत आरोप करत ठाकरेंच्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. दादर परिसरात राहणाऱ्या गौरी भिडे आणि त्यांचे वडील अभय भिडे यांनी ही याचिका दाखल केल्याची माहिती समोर येत आहे. भिडे यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती एस. गंगापूरवाला आणि न्यायमूर्ती आर. एन. लद्धा यांच्या खंडपीठापुढे बुधवारी यावर सुनावणी झाली. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत भिडे यांनी ठाकरेंचं उत्पन्न आणि त्यांची संपत्ती याचा ताळमेळ लागत नसल्यानं याप्रकरणाची सीबीआय आणि ईडीमार्फत चौकशी करण्याची मागणी केल्याचे समजते. या याचिकेच्या सुनावणीपूर्वी गौरी भिडे यांची याचिका स्वीकारण्यास कुणीही वकील तयार होत नव्हते. त्यामुळे त्या स्वत:चं कोर्टापुढे युक्तिवादासाठी उभ्या राहिल्या. यावेळी त्यांच्या याचिकेवर उच्च न्यायालय कार्यालयाने काही आक्षेप घेतल्याने ते दूर करण्याचे निर्देश दिले असून, न्यायालयाने त्यांना



2 आठवड्यांची मुदत दिली आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी आता 16 नोव्हेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. याचिकेत काय म्हटले आहे ? उद्धव ठाकरे यांची संपत्ती ही भ्रष्टाचार आणि गैरमार्गाने जमा करण्यात आली असून, ही बेहिशेबी मालमत्ता आहे. या मालमत्ते विरोधात त्यांनी सर्व 11 जुलै 2022 रोजी मुंबई पोलीस आयुक्तांकडे पत्र लिहून तक्रारही दाखल केलेली आहे. मात्र, त्यावर आजपर्यंत काहीच कारवाई करण्यात आलेली नाही.

ठाकरे यांच्या या भ्रष्टाचार आणि मनीलॉन्ड्रिंगचे पुरावे असूनही कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या याचिकेत केंद्रीय गृह मंत्रालय, केंद्रीय अर्थ मंत्रालय, सीबीआय, मुंबई पोलीस आयुक्त, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, रश्मी ठाकरे आणि तेजस ठाकरे या सर्वांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे.या सर्वांनी भारतीय राज्यघटना, आयपीसी, सीआरपीसी, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, लोकप्रतिनिधी कायदा या सगळ्यांचे उल्लंघन केलेले आहे. उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आहेत. आदित्य ठाकरे हे त्यांच्याच कॅबिनेटमधले महत्त्वाचे मंत्री होते. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणूनच त्यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि आयपीसीचे कलम 21 हे लागू होते. लोकप्रतिनिधी कायदादेखील लागू होतो. याशिवाय यातील प्रतिवादी क्रमांक 7 आणि 8 रश्मी ठाकरे, तेजस ठाकरे हे उद्धव ठाकरेंचे अत्यंत जवळच्या नातेवाईक असल्याने त्यांचीही चौकशी या कायद्यानुसार व्हायला हवी. सामना आणि मार्मिकच्या विक्रीतून एवढी अफाट संपत्ती गोळा होणे, मातोश्री 2 सारखी टोलेजंग इमारती उभी करणे, आलिशान गाड्या, फार्महाऊसेस घेणे निव्वळ अशक्य आहे.

### याचिकाकर्त्या गौरी भिडे कोण?

**सामना आणि मार्मिक प्रकाशित करणारा ठाकरे कुटुंबियांच्या मालकीचा ‘प्रबोधन’ प्रकाशनचा छापखाना जिथे आहे, त्याच्या शेजारीच गौरी भिडे यांच्या आजोबांचा ‘राजमुद्रा’ प्रकाशन हा छापखाना होता.सांगण्यात आले. त्यानुसार आता गत पावणे तीन वर्षातील बँक स्टेटमेंट आणि तक्रार अर्ज महापालिका आयुक्तांकडे सादर करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. कोणताही भाई असो त्यांना घरी पाठवू असा इशारा मनसे शहराध्यक्ष दिलीप दातीर यांनी यावेळी दिला.**

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून पाच दिवस मॅरेथॉन दौऱ्यावर !

## भरगच्च कार्यक्रमांची यादी जाहीर

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून मॅरेथॉन दौऱ्यावर जाणार आहेत. पाच दिवसांत ते तीन राज्यांत जाणार असून जवळपास एक डझनभर कार्यक्रमांना हजेरी लावणार आहेत. आजपासून त्यांचा गुजरात दौरा सुरू होणार आहे. पंतप्रधानांच्या ऑफिसमधून सांगण्यात आले की, मोदी सर्वांत आधी गांधीनगरमधील महात्मा मंदिर कन्व्हेन्शन आणि एक्झिबिशन सेंटरमध्ये संरक्षण प्रदर्शन – 2022 चे उद्घाटन करतील. तसंच आज ते पाच वेगवेगळ्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. संरक्षण प्रदर्शनाला पंतप्रधान सर्वप्रथम उपस्थित राहणार आहेत. एक भारतीय पॅव्हेलियन आणि दहा राज्य पॅव्हेलियन असतील. भारतीय पॅव्हेलियनमध्ये पंतप्रधान हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) द्वारे डिझाइन केलेल्या HTT-40 या स्वदेशी ट्रेनर विमानाचे अनावरण करतील. विमानात अत्याधुनिक रणनीतिक प्रणाली असून ते वैमानिक अनुकूल वैशिष्ट्यांसह डिझाइन



केलेले आहे. कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान उद्योग आणि स्टार्टअप्सच्या माध्यमातून अंतराळ क्षेत्रातील संरक्षण दलांसाठी नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी मिशन डेफस्पेस लॉन्च करणार आहेत.

गुजरातमधील डीसा एअरफील्डची पायाभरणीही पंतप्रधान करणार आहेत. या फॉरवर्ड एअर फोर्स बेसमुळे देशाच्या सुरक्षा पायाभूत सुविधा मजबूत होतील. त्यानंतर ते अडालज येथील त्रिमंदिर येथे 'मिशन स्कूल्स ऑफ एक्सलन्स' सुरू करतील. मिसिंग लिंक्सच्या बांधकामासाठी तसेच कोस्टल हायवेच्या सुधारणांसाठी ते पायाभरणी करणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात 13 जिल्ह्यांमध्ये एकूण 270 किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे महामार्ग

### 21 ऑक्टोबर रोजी उत्तराखंड दौऱ्यावर

21 ऑक्टोबर रोजी उत्तराखंड दौऱ्यावर

२१ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान सकाळी केदारनाथ आणि बद्रीनाथला पोहोचतील, जिथे ते 3,500 कोटी रुपयांच्या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांची पायाभरणी करतील. यादरम्यान ते केदारनाथ आणि बद्रीनाथ मंदिरांना भेट देतील. यानंतर ते 9 वाजता केदारनाथ रोपवे प्रकल्पाची पायाभरणी करतील. पंतप्रधान आदिगुरू शंकराचार्यांच्या समाधी स्थळालाही भेट देतील आणि मंदाकिनी आणि सरस्वती नदीच्या काठावर सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेतील. यानंतर पंतप्रधान 11.30 च्या सुमारास बद्रीनाथला पोहोचतील आणि त्यानंतर तेथे पूजा आणि दर्शन घेतील.

पंतप्रधान तेथील रिव्हरफ्रंट विकास कामाच्या प्रगतीचा आढावा घेतील आणि माना गावात रस्ता आणि रोपवे प्रकल्पाची पायाभरणी करणार आहेत. यानंतर दुपारी दोनच्या सुमारास पंतप्रधान 'अरायव्हल प्लाझा' आणि तलावांच्या विकासकामांचाही आढावा घेतील.

### 22 तारखेला मध्य प्रदेशात

धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 4.5 लाख लाभार्थी आभासी माध्यमातून मिळणार आहेत. यावेळी मुख्य कार्यक्रम सतना येथील बीटीआय मैदानावर होणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले. विशेष म्हणजे 35 दिवसांत पंतप्रधान तिसऱ्यांदा राज्यातील जनतेशी संवाद साधणार आहेत.

### 23 रोजी अयोध्येत रामललाचे दर्शन घेणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी 23 तारखेला अयोध्येला पोहोचणार आहेत. तेथे रामलल्लाची पूजा करून दर्शन घेतील. यानंतर राम जन्मभूमी तीर्थक्षेत्राची पाहणी करतील. यादरम्यान प्रभू श्रीराम राज्य अभिषेकात सहभागी होणार आहेत.

# काँग्रेसचे नवे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे



**। नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली आहे. काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांचा पराभव करत त्यांनी मोठा विजय संपादन केला आहे. त्यामुळे सुमारे २५ वर्षांनंतर बिगर-गांधी नेता काँग्रेसच्या अध्यक्षपदी विराजमान होणार आहे. अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर आता ८० वर्षीय खरगे यांच्या खांद्यावर पक्षाची पुनर्बांधणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. मागील काही वर्षांत काँग्रेसला सतत पराभवाचा सामना करावा लागला आहे, त्यामुळे खरगे यांच्यासमोर अनेक आव्हानं आहेत.

काँग्रेस हा देशातील सर्वात जुना राजकीय पक्ष आहे. या पक्षाला मोठा वैभवशाली राजकीय इतिहास आहे. पण मागच्या काही वर्षांत काँग्रेसची झालेली अवस्था अस्वस्थ करणारी आहे. त्यामुळे नवीन अध्यक्षाला आता काँग्रेसच्या जुन्या इतिहासात रमून चालणार नाही, त्यांना वस्तुस्थिती लक्षात घेऊन मतदारांचं लक्ष वेधून घेण्यासाठी नावीन्यपूर्ण काम करावं लागेल. लोकांच्या मनात काँग्रेस पुन्हा रुजवण्यासाठी नेहमीपेक्षा वेगळे प्रयत्न करावे लागतील.

## बिल्किस बानो प्रकरणातील 'त्या' दोषीवर विनयभंगाचा गुन्हा दाखल

### 11 दोषींपैकी एकावर आणखी एक विनयभंगाचा गुन्हा

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

गुजरातमधील गोध्रा घटनेनंतर 2002च्या बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा झालेल्या सर्व 11 दोषींची ऑगस्ट महिन्यात गोध्रा उपकारागृहातून मुदतपूर्व सुटका करण्यात आली होती. त्यावरून तीव्र पडसाद उमटले होते. त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आल्या होत्या. चांगली वर्तणूक आढळल्याने या दोषींची मुदतपूर्व मुक्तता केल्याचा खुलासा गुजरात सरकारने सर्वोच्च न्यायालयात केला होता. परंतु, आता आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. ११ दोषींपैकी एकावर आणखी एक विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे. यावरील प्रकरणही न्यायालयात प्रलंबित आहे. ११ दोषींपैकी नितेश चिमणलाल भट २०२० मध्ये पॅरोलवर सुटला होता. यावेळी त्याने एका महिलेचा विनयभंग केला. जून २०२० मध्येच त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून खटला अजून प्रलंबित आहे. गुजरात सरकारच्या शपथपत्रातूनच ही माहिती समोर आली आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कैद्यांची सुटका करण्याचे आदेश केंद्र सरकारने एका विशेष धोरणाद्वारे राज्यांना दिले होते. परंतु या धोरणातून बलात्काराच्या आरोपात दोषी ठरलेल्या आरोपींना वगळण्यात आले होते. असे असताना बिल्किस बानो प्रकरणातील दोषींची सुटका करण्यात आल्याचे सांगत विरोधकांनी गुजरात तसेच केंद्र सरकारवर टीकास्त्र सोडले.

# महापालिकांच्या निवडणुकांचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या दरबारी!

## आजच्या सुनावणीकडे सर्वांचं लक्ष

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

थेट नगराध्यक्ष पदाची निवड, प्रभाग रचनेत केलेले बदल याविरोधात आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निकालानंतर मुंबईसह राज्यातील विविध महापालिकांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सुनावणीकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.

राज्य सरकारने प्रभाग रचनेत केलेले बदल, थेट नगराध्यक्षपदाची



निवड याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. तसंच, जुलै महिन्यात ओबीसी राजकीय आरक्षण मिळाले. परंतु, ९२ नगरपरिषदांमध्ये हे आरक्षण नसल्याने राज्य सरकारने कोर्टात याचिका दाखल केली आहे. अशा विविध याचिकांवरील सुनावणीमुळे राज्यतील महापालिकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. मुंबईसह राज्यातील अनेक महापालिकांमध्ये सध्या प्रशासकीय राजवट आहे. गेल्या सहा महिन्यांपासून महापालिकांवर प्रशासकीय राजवट असल्याने अनेक कामे रखडली आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निकालाकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. सर्वोच्च न्यायालायच्या आजच्या सुनावणीनंतर महापालिकेच्या निवडणुका केव्हा होणार याबाबत स्पष्टता होणार आहे. मुंबईसह 23 महानगरपालिका, 25 जिल्हा परिषदा, 284 पंचायत समित्या, 207 नगरपालिका, 13 नगरपंचायती निवडणुकांची प्रक्रिया प्रक्रिया संदर्भातील याचिकांवर आज सुनावणी होणार आहे.




# 'एकदम कडक' चित्रपट लवकरच होणार प्रदर्शित

मराठी चित्रपटसृष्टीमध्ये अनेक वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट बनविले जातात. त्यातील काही चित्रपट समाजातील अवगुणांवर भाष्य करणारे होते. दरम्यान या चित्रपटामधील आकर्षक सीनने प्रेक्षकांचं लक्ष विशेष वेधून घेतलं होतं. या आकर्षक चित्रपटांच्या यादीत आणखी एका चित्रपटाची एंट्री झाली आहे, या धाटणीच्या अंतर्गत येणारा आणि तरुणाईला पसंतीस पडणाऱ्या एका नव्याकोऱ्या आकर्षक, रोमँटिक, संघर्षमय, आशयघन अशा 'एकदम कडक' चित्रपटाचे पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे. 'ओम साई सिनेफिल्म प्रॉडक्शन' प्रस्तुत 'एकदम कडक' या चित्रपटात अभिनेता पार्थ भालेराव, चिन्मय संत तसेच सैराट फेम तानाजी गलगुंडे व अरबाज हा तरुण कलाकारांचा ग्रुप नव्याने मोठ्या पडद्यावर धुडगूस घालायला सज्ज झाला आहे. पोस्टर पाहता हे कॉलेजचे विद्यार्थी त्यांची कॉलेज लाईफ जगण्याचा मनमुराद आनंद घेतायत हे कळतेय, तर ही मुलं पाहत असणारी मुलगी नक्की कोण आहे, हे मात्र अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे.

आकर्षक आणि आशयघन अशा या वेगळ्या धाटणीच्या चित्रपटात एकदम कडक नेमकं काय पाहायला मिळणार आहे, हे येत्या २ डिसेंबरला सिनेमागृहात पाहणे रंजक ठरेलच. 'ओम साई सिनेफिल्म प्रॉडक्शन' प्रस्तुत या चित्रपटाच्या निर्मितीची आणि दिग्दर्शनाची दुहेरी धुरा गणेश शिंदे यांनी पेलवली आहे. तर पटकथा आणि संवाद कल्पेश जगताप याचे असून चित्रपटाच्या संगीताची बाजू स्व.नरेंद्र भिडे, पंकज पडघन यांनी सांभाळली आहे. तर सुप्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते, उमेश गवळी, सायली पंकज, सौरभ साळुंके यांनी त्यांच्या सुमधुर स्वरात चित्रपटातील गाणी सुरबद्ध केली आहेत. तर चित्रपटातील गीत मंगेश कांगणे यांचे आहे.

# भाजपने रितेश-जेनेलियाला घेरलं

## कंपनीला 116 कोटींचे कर्ज मंजूर झाले कसे?

अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांच्यावर गंभीर आरोप भाजपनं केले आहे. त्यामुळे वेगळ्याच चर्चेला उधाण आले आहे. लातूरमधील 16 उद्योजकांना डावलून देशमुखांना अवघ्या दहा दिवसांत भुखंड मंजूर करण्यात आल्याचा आरोप भाजपनं केला आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेनं त्यांना 116 कोटींचा पुरवठा काही दिवसातच कसा काय केला गेला असा सवालही यानिमित्तानं समोर आला आहे.

रितेश आणि जेनेलिया यांच्या कंपनीला अवघ्या एका महिन्यात 120 कोटींचे कर्ज कसे देण्यात आले आहे. ते कसे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

मराठी वृत्त वाहिनी एबीपी माझानं व्हायरल केलेल्या बातमीमध्ये रितेश आणि जेनेलिया यांच्यावर वेगवेगळे आरोप करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. हाती आलेल्या माहितीनुसार, कमी कालावधीत अवघ्या महिन्याच्या आत त्यांना कर्ज मिळाले. त्या बॅंकेने आतापर्यंत किती जणांना कर्ज दिले? त्या बॅंकेने



# अखेर प्रतीक्षा संपली... 'लायगर' चित्रपटाचे हिंदी व्हर्जन 'या' दिवशी होणार

दाक्षिणात्य स्टार विजय देवरकोंडा, बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे यांचा 'लायगर' हा चित्रपट काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला. हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस पडला नाही. अनन्याची या चित्रपटामधील भूमिका पाहून नेटकऱ्यांनी तिची खिल्ली उडवली. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवसापासूनच या चित्रपटाला थंड प्रतिसाद मिळत होता. १२० कोटी रुपयांचं बजेट असलेला 'लायगर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ४० कोटी रुपयांच्या आसपासच गल्ला जमवू शकला.



# जळू नका, बरोबरी करा!'

सोशल मीडियावर आपल्या आगळ्या वेगळ्या स्टाईलनं हजारो नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेणाऱ्या दीपिका आणि प्रसादची गोष्ट काही औरच आहे. ते नेहमीच त्यांच्या रिल्समुळे चर्चेत असतात. ते सोशल मीडियावर प्रसिका या नावानं लोकप्रिय आहेत, गेल्या काही दिवसांपासून प्रसिका हे इन्फ्ल्युंएसर कपल वेगळ्या कारणासाठी चर्चेत आले आहे. प्रसादला नेटकऱ्यांनी ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे व्यथित झालेल्या दीपिकानं नेटकऱ्यांना सडेतोड उत्तर दिली आहे.

प्रसिकानं ट्विट करुन आपल्या मनातील खदखद व्यक्त केली आहे. तिनं त्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, अनेकांनी माझ्या पतीला बदनाम करण्याचा आणि अपमानित केले आहे. त्याचे कारण म्हणजे त्यानं मला पैसे कमविण्यासाठी सांगितलं म्हणून. ज्यांनी कुणी आम्हाला ट्रोल केले आहे त्यासर्व कार्यकर्त्यांना मला सांगायचे आहे की, आम्ही बिझनेस पार्टनर्स आहोत. नवरा बायको होण्यापूर्वी शाळेतली मित्रही. आम्ही दोघांनी मिळून आमचं विश्व तयार केलं आहे. तेव्हा आमच्यावर जळु नका. आमच्याशी हवं तर बरोबरी करण्याचा प्रयत्न करा. असं प्रसिकानं म्हटलं आहे. प्रसिकाच्या त्या व्टिटवर अनेकांनी आपआपल्या प्रतिक्रियाही दिल्या आहेत. प्रसाद आणि दीपिकाविषयी सांगायचे



# परदेशी नागरिकांनाही चंद्रा गाण्याची भूरळ!



मुंबई : काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झालेल्या प्रसाद ओक दिग्दर्शित 'चंद्रमुखी' या चित्रपटातील 'चंद्रा' गाण्यानं राज्यासह देशभरातील संगीत रसिकांना वेड लावलं होतं. अजय अतुलच्या संगीतसाजानं नटलेल्या या गाण्यात वेगळीच नशा आहे. त्यामुळेचं या गाण्याची परदेशी नागरिकांनाही भूरळ पडली आहे. याचा एक भन्नाट व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे

व्हायरल व्हिडिओत परदेशी तरुणी चंद्रा या गाण्यावर नाचताना दिसत आहे. परदेशातील रस्त्यावर तरुणींच्या या ग्रुपनं या गाण्यावर हुबेहुब अमृता खानविलकरप्रमाणं नृत्य सादर केलं आहे. विशेष म्हणजे हा तरुणींचा ग्रुप प्रोफेशनल डान्सर असल्याचं यातून स्पष्ट होतं. कारण त्यांच्या डान्सस्टेप्समध्ये परफेक्शन दिसून येतं. विशेष म्हणजे शॉर्ट आणि टॉप त्यात गळ्यात विविधरंगी स्टोल अशा पेहरावात या गाण्यावर तरुणी थिरकलेल्या दिसल्या. अजय-अतुल फॅन्स नामक एका फेसबुक पेजवर हा व्हिडिओ अपलोड करण्यात आला असून त्याला ४० हजारांहून अधिक लाईक्स, ८०० हून अधिक कमेंट्स आणि जवळपास साडेचार हजार शेअर्स आहेत. यावरुन मोठ्या प्रमाणावर लोकांनी हा व्हिडिओ पाहिल्याचं स्पष्ट होत असून अनेकांना तो आवडलाही आहे. युजर्सनी यावर अनेक पॉझिटिव्ह कमेंट्स केल्या आहेत. यामध्ये अनेकांनी अजय-अतुलच्या संगीताची जादूच निराळी असल्याचं म्हटलं आहे. तर अनेकांनी चंद्रा गाण्याची कोरियोग्राफर फुलवा खामकर, गायक श्रेया घोषाल आणि अभिनेत्री अमृता खानविलकर यांच्या कामगिरीकीचंही कौतुक केलं आहे.

## शॉर्ट न्यूज »

### ला नुशिया बुद्धिबळ स्पर्धा : रौनक साधवानीला जेतेपद

। मुंबई । महाईन्यूज



ला नुशिया (स्पेन) : भारताचा ग्रँडमास्टर रौनक साधवानीने नऊपैकी आठ गुणांची कमाई करत तिसऱ्या ला नुशिया आंतरराष्ट्रीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे जेतेपद पटकावले. नऊ फेऱ्यांअंती नागपूरचा रौनक आणि दुसऱ्या स्थानावरील खेळाडूमध्ये एका गुणाचे अंतर होते.

अखेरच्या फेरीत रौनकने स्पेनच्या ग्रँडमास्टर डॅनिल युफाला अवघ्या २० चालींमध्ये पराभूत केले. ग्रँडमास्टर कारेन ग्रिगोरयान (अर्मेनिया) आणि आंतरराष्ट्रीय मास्टर एर्नेस्टो जे फर्नांडिझ गुइलेन (क्युबा) यांनी सात गुणांसह अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान मिळवले. या स्पर्धेत सहभाग नोंदवणारा रौनक हा एकमेव भारतीय बुद्धिबळपटू होता आणि सलग दुसऱ्या वर्षी भारतीय खेळाडूने या स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे.

# वेस्ट इंडिजचा झिम्बाब्वेवर 31 धावांनी विजय!

## सुपर 12 मध्ये जाण्याच्या आशा कायम

अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




टी२० विश्वचषकाच्या आठव्या सामन्यात वेस्ट इंडिजने झिम्बाब्वेचा ३१ धावांनी पराभव केला. होबार्टमध्ये बुधवारी (१९ ऑक्टोबर) वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत झिम्बाब्वेसमोर १५४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात झिम्बाब्वेचा संघ केवळ १२२ धावा करू शकला. या विजयासह वेस्ट इंडिजचा संघ सुपर १२ मध्ये पोहोचण्याच्या शर्यतीत कायम आहे. वेस्ट इंडिजचा पहिला सामना स्कॉटलंडविरुद्ध क्वालिफायर फेरीत हरला. अशा स्थितीत विंडीजसाठी हा करा किंवा मरो असा सामना होता आणि कॅरेबियन खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत आपल्या संघाला बाद होण्यापासून वाचवले.

वेस्ट इंडिजकडून अल्झारी जोसेपने शानदार गोलंदाजी करत चार बळी घेतले. त्याचवेळी जेसन होल्डरने तीन बळी घेतले. अकिल हुसेन, ओबेद मॅकॉय आणि ओडियन स्मिथ यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. झिम्बाब्वेकडून जोंगवेने सर्वाधिक २९ धावा केल्या. त्याचवेळी मधेवरेने २७ धावांची खेळी खेळली. १५४ धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात चांगली झाली. पाच षटके खेळली गेली तोपर्यंत झिम्बाब्वेने दोन गडी गमावून ४७ धावा केल्या होत्या, पण झिम्बाब्वेच्या मधल्या फळीला फारसे काही करता आले नाही. झिम्बाब्वेने १७ धावांच्या अंतरात चार गडी गमावले आणि अखेरीस संपूर्ण संघ १८.२ षटकांत १२२ धावांत गारद झाला.

या सामन्याच्या पहिल्या डावात झिम्बाब्वेच्या सिकंदर रझाने धोकादायक गोलंदाजी केली. त्याने चार षटकांत १९ धावा देत तीन बळी घेतले. मुजारबानीला दोन आणि शॉन विल्यम्सला एक गडी बाद केला. वेस्ट इंडिजचा काइल मेयर्स १२ चेंडूत १३ धावा काढून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत दोन चौकार मारले. ब्लेसिंग मुजारबानीच्या चेंडूवर तो यष्टिरक्षक रेगिस चकाबवाकरवी झेलबाद झाला. त्याच्यानंतर दहाव्या षटकात एविन लुईस बाद झाला. सिकंदर रझाच्या चेंडूवर तो मिल्टन शुम्बाने झेलबाद झाला. लुईसने १८ चेंडूत १५ धावा केल्या.

# डेन्मार्क खुली बॅडमिंटन स्पर्धा : श्रीकांतची विजयी सलामी

## श्रीकांतने जागतिक क्रमवारीत 14 व्या स्थानी

।ओडेन्से।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

माजी विजेत्या किदम्बी श्रीकांतने हाँगकाँगच्या एनजी का लॉन्ग अँगसला चुरशीच्या लढतीत पराभूत करत डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील (सुपर ७५० दर्जा) पुरुष एकेरीची दुसरी फेरी गाठली.

श्रीकांतने जागतिक क्रमवारीत १४ व्या स्थानी असलेल्या अँगसला ५६ मिनिटे चाललेल्या लढतीत १७-२१, २१-१४, २१-१२ असे नमवले. महिला दुहेरीत भारताच्या ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीने डेन्मार्कच्या अॅलेक्झांड्रा बो आणि अॅमालिए मागेलूंड जोडीला २१-१५, २१-१५ असे सरळ गेममध्ये पराभूत करत आगेकूच केली.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजिटल आवृत्ती छपाईसाठी नाही